प्रेषक,
विश्वास गावडे
इंद्रप्रस्थ कॉम्प्लेक्स, B6/204, गाव देवी मंदीर जवळ,
नवघर गाव, भाईंदर पूर्व,
मुंबई- 401105

DATE:- 03/05/2023

मिरा भाईंदर महानगरपालिका
प्रभाग समिती कार्यालय क्र. ३
आवक क्र....90...........
दाखल दि....3/5/23....
लिपीक

5 रु. कोर्ट फी COURT FEE Rs.5
भारत INDIA
पाँच रुपये FIVE RUPEES

प्रति,
माहिती अधीकारी
प्रभाग समिती 3, महानगर पालिका, तलाव रोड,
भाईंदर - पूर्व,

विषय :- खालील गोष्टींची माहिती मिळण्याबाबत

माननीय महोदय,
आपणांस कळविण्यात येते की खालील शासकीय गोष्टींची माहिती आपणांस काडून मिळावी म्हणून हा अर्ज करत आहे.

1) निवडणूक आयोगातर्फे मीरा भाईंदर महानगरपालिकेकडून जे नगरसेवक पदासाठी जी निवडणुक लढवून जे नगरसेवक पदावर कार्यरत होतात त्यांची कालमर्यादा किती वर्षांची असते?.
2) जर नगरसेवकांची कालमर्यादा संपूनही पुन्हा निवडणूक होण्यासाठी काही कारणास्तव पुढे ढकलली तर त्याची कालमर्यादा किती असू शकते. व जर नगरसेवक पदासाठी कालमर्यादा संपली व निवडणूक आयोगाने निवडणूक वेळेवर घेतली नाही तर त्याला कोणता कायदेशीर पर्याय उपलब्ध आहे.
3) जर नगरसेवक पदावर कार्यरत असतांना जेव्हा त्यांचा कालावधी संपतो तेव्हा सामन्य नागरिक त्या नगरसेवकांचे लोकप्रतिनिधीत्व स्वीकारू शकतात का?
४) जेव्हा एका प्रभागामध्ये सद्या सत्ता संघर्षाची सुप्रीम कोर्टात असल्याने महानगर पालिकेच्या नगरसेवक पदावर निवडणुका त्या कालावधीत झाल्या नाहीत तर त्या प्रभागातील सामन्य नागरिकांच्या आरोग्याचा, सुविधांचा अभाव व इतर सामाजिक किंवा शैक्षणिक सेवेसाठी महापलिकाकडे कोणत्या पर्यायी व्यवस्था किंवा उपाययोजना आहेत?

वरील सर्व गोष्टींची माहिती माहिती अधिकारीकडून मिळेल यावर विश्वास आहे व त्यात पारदर्शकता राहील हेच अपेक्षित आहे.

धन्यवाद,

आपला सामन्य नागरिक

विश्वास गावडे
मोबाईल क्रमांक
9819587650

श्री दानिश लुब्के
4/5/2023

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कै. मोरेश्वर नारायण पाटील प्रभाग कार्यालय क्र.३
खारी तलाव मराठी शाळा क्र. ६, दुसरा माळा,
भाईंदर(पूर्व), ता.जि.ठाणे-४०११०५. दूरध्वनी :२८१७८५२२


जा.क्र.मनपा/प्र.का.३/भा.पु./९० /५०४/२०२३-२४ दिनांक:१० / ५ /२०२३

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.स./म.प./ज.प.
आवक क्र. ......१४......
दिनांक:- ११ / ०५ /२०२३

प्रति,
मा. नगरसचिव
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय : "केंद्रशासनाचा माहिती अधिकार अधिनियम २००५" अन्वये माहिती मिळणेबाबत.
संदर्भ : श्री. विश्वास गावडे यांचा दि.०३/०५/२०२३ रोजीचा अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते कि, "केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५" अंतर्गत श्री. विश्वास गावडे यांचा वरील संदर्भिय अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदरच्या अर्जात त्यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडुन निवडुन येणा-या नगरसेवकांच्या कालमर्यादाबाबतची माहिती अपेक्षिलेली आहे. सबब सदरचा विषय हा आपल्या विभागाशी निगडीत असल्यामुळे "केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम २००५" कलम ६(३) अन्वये संदर्भिय अर्ज पुढील कारवाईसाठी आपल्या विभागास वर्ग करण्यात येत आहे.

तरी अर्जदार यांनी अपेक्षिलेली माहिती त्यांना मुदतीत परस्पर देण्यात यावी ही विनंती.

सोबत :- संदर्भिय अर्जाची छायांकित प्रत.

(प्रभाकर म्हात्रे)
सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र. ०३
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग कार्यालय क्र.३

प्रत :
श्री. विश्वास गावडे
बी६/२०४, गावदेवी मंदिर जवळ
इंद्रप्रस्थ कॉम्प्लेक्स,
भाईंदर (पु.) ४०११०५.

010

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./98/2023 दिनांक :- 16/5/2023

प्रति,
**श्री. विश्वास गावडे,**
**इंद्रप्रस्थ कॉम्प्लेक्स, B6/204,**
**गावदेवी मंदिरजवळ, नवघर गांव,**
**भाईंदर (पूर्व), 401 105.**

**विषय :-** **माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **1) सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र. 03, मि.भा.मनपा यांचेकडील दि. 10/05/2023 रोजीचे पत्र.**
**(या कार्यालयास प्राप्त दि. 11/05/2023)**
**2) आपणांकडील दि. 03/05/2023 रोजीचा माहिती अधिकार नियम 2005 अंतर्गत अर्ज.**

महोदय,

सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र. 3 संदर्भित पत्र क्र 01 अन्वये आपणांकडील संदर्भित पत्र क्र. 02 ची मुळप्रत या कार्यालयाकडे आपणांस परस्पर माहिती उपलब्ध करुन देणेसाठी वर्ग केलेली आहे.

आपण संदर्भित पत्र क्र. 02 अन्वये मागितलेली माहिती पुढीलप्रमाणे देत आहोत.

| मुद्दा क्र. | माहिती |
|---|---|
| 1 | महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या नगरसेवकांच्या पदाचा कालावधी पाच वर्ष आहे. |
| 2 | नगरसेवक पदाची कालमर्यादा संपूनही निवडणूक आयोगाने निवडणूक वेळेवर घेतली नाही तर महाराष्ट्र शासन महानगरपालिकेवर प्रशासकाची नेमणूक करते. |
| 3 | नगरसेवक पदी निवडून आलेल्या व्यक्तीचा नगरसेवक पदाचा कालावधी संपुष्टात आलेनंतर ती व्यक्ती लोकप्रतीनिधी राहत नाही. |
| 4 | शहरातील नागरिकांना आरोग्य विषयक, विवीध सुविधांचा अभाव, सामाजिक व शैक्षणिक सेवेबाबत काही तक्रारी असल्यास किंवा सुविधा प्राप्त करुन घ्यावयाची असल्यास, नागरिक महानगरपालिकेचे संकेतस्थळावर व ईमेलद्वारे तसेच महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय, प्रभाग समिती कार्यालय येथे तक्रार अर्ज / विनंती अर्ज देऊ शकतात. तसेच महानगरपालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी विवीध ऑनलाईन ॲप सुरु केले असून त्याचा लाभ नागरिक घेऊ शकतात. |

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी**
**सचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

pc 2U:\01 Pranali\Mahiti Adhikari\Letter - Vishwas Gavde.docx